पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे 411 001.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- [illegible]

मान्यतेचे प्रमाणपत्र नमुना 2

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/मा.प्र.मा. 1/ [illegible] /2022, पुणे 1/ [illegible]
प्रति,   दिनांक [illegible] /4/2022

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
श्री जैन विद्या प्रसारक मंडळ, चिंचवडगाव पुणे 411033 संचलित श्री गुरु गणेश विद्या मंदिर स.न.27 अ, प्राधिकरण निगडी पुणे 44

विषय : बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क अधिनियम, 2009 मधील कलम 18 च्या तरतुदीनुसार, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 मधील नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळेला मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत

संदर्भ : श्री. [illegible] विस्तार अधिकारी (शिक्षण) [illegible] दिनांक 21/01/2022

आपल्या दिनांक 21/01/2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार आणि केलेली तपासणी याआधारे, मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक 1 एप्रिल 2019 पासून दिनांक 31 मार्च 2022 पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते इयत्ता 4 थी करिता श्री जैन विद्या प्रसारक मंडळ, चिंचवडगाव पुणे 411033 श्री गुरु गणेश विद्या मंदिर स.न.27 अ, प्राधिकरण निगडी पुणे 44 UDISE क्रमांक 27252002413 (अनुदानित [illegible] माध्यम) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:-

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता अनुदानित मान्यता किंवा अनुदान देण्याबाबत शासनावर कोणतेही बंधन नसेल,

2.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009(परिशिष्ट एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम, 2011 (परिशिष्ट दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील,

3,शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल,

4,परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते ठेवावे लागेल,

5, संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही,

6 ,कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारला जाणार नाही,

7(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही,
(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही,

(तीन)कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही,

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल,

(पाच)विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल,

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल,

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि